# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## ( आस्थापना विभाग )

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था/४२९०/२०१९ दि. ०५/१२/२०१९

प्रति,

सर्व सन्माननीय सदस्य
अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद
परिक्षा व मुल्यमापन मंडळ,
अभ्यास मंडळे व अन्य प्राधिकरणे
तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- गोंडवाना विद्यापीठात "१७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव इंद्रधनुष्य-२०१९" चा कार्यक्रम संपन्न होत असल्याबाबत.**

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात आनंद होत आहे, **"१७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव इंद्रधनुष्य-२०१९"** चे आयोजन करण्याची जबाबदारी मा. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई यांनी आपल्या विद्यापीठाकडे सोपविलेली आहे. दिनांक ०२ डिसेंबर २०१९ ते ०६ डिसेंबर २०१९ या कलावधीत सदर उत्सवाचे आयोजन करण्यात आलेला आहे.

इंद्रधनुष्य - २०१९ या सांस्कृतिक युवा महोत्सवाचे समारोपीय व बक्षिस वितरण समारंभ, शुक्रवार दिनांक ०६ डिसेंबर, २०१९ सकाळी १०.३० वाजता विद्यापीठ परिसर येथे संपन्न होत असुन समारोपीय व बक्षिस वितरण समारंभाचे अध्यक्ष म्हणुन मा. कुलगुरू, डॉ. नामदेव कल्याणकर हे उपस्थित राहणार असुन प्रमुख अतिथी म्हणुन **मा. श्री. श्रेयश तळपदे,** मराठी व हिंदी सिने अभिनेता, मुंबई म्हणुन उपस्थिती दर्शविणार आहे तसेच मा. प्र-कुलगुरू, डॉ. चंद्रशेखर भुसारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

"१७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव इंद्रधनुष्य-२०१९" या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील २० विद्यापीठातील स्पर्धक सहभागी झाले असुन अंदाजे १००० विद्यार्थी कलाकार, प्राध्यापकासह या उत्सवामध्ये मोठया प्रमाणात सहभाग दर्शविलेला आहे.

आपणास नम्र विनंती करण्यात येते की, "१७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव इंद्रधनुष्य-२०१९" च्या समारोपीय व बक्षिस वितरण समारंभ शुक्रवार, दिनांक ०६ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजीत असुन संपन्न होणाऱ्या समारंभामध्ये वेळेपुर्वी उपस्थिती दर्शवावी, ही आग्रहाची विनंती.

धन्यवाद !

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषीत:-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६) मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७) मा. संचालक, नवोपक्रम व नवसंशोधन, व साहचार्य मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
८) मा. संचालक, क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

D:\order\indradhanusha 2019